खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### वाणिज्य विभाग : डॉ. वाळके यांचे व्याख्यान

पुढारी

**संक्षिप्त**



राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. वाळके.

### प्रात्यक्षिकावर आधारित शिक्षणाची गरज

**राजगुरुनगर :** वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानावर विसंबून न राहता तांत्रिक व प्रात्यक्षिकावर आधारित ज्ञान संपादित करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पेठ येथील एस. एन. जी. इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड मॅनेजमेंटचे डायरेक्टर डॉ. एस. एन. वाळके यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी रविवारी (दि. ३) आयोजित कार्यशाळेत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी या विषयावर बोलत होते. याप्रसंगी प्रा. स्वप्निल शहा, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. गणेश धुमाळ, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रा. एस. एस. चौधरी आणि वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एस. एन. वाळके यांनी मनोगतात एम.बी.ए.चे महत्त्व समजावून सांगितले. प्रत्येक कंपनीमध्ये व्यवस्थापन व प्रशासन केल्याशिवाय कामकाज योग्य पद्धतीने होऊ शकत नाही. त्यामुळे एम.बी.ए.च्या माध्यमातून विद्यार्थी हा प्रशासकीय व व्यवस्थापन या दोन्ही विषयांमध्ये सखोल ज्ञान संपादन करून चांगल्या संधीला गवसणी घालू शकतो, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पायल ओसवाल यांनी केले, तर आभार प्रा. एस. एस. चौधरी यांनी मानले.

लोकमत

# प्रात्यक्षिकावर आधारीत ज्ञान घ्या: वाळके

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर:** वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानावर विसंबून न राहता तांत्रिक व प्रात्यक्षिकावर आधारित ज्ञान संपादित करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पेठ येथील एस. एन. जी. इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड मॅनेजमेंटचे डायरेक्टर डॉ. एस. एन. वाळके यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील विद्यार्थांसाठी आयोजित कार्यशाळेत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी या विषयावर डॉ. वाळके यांचे व्याख्यान होते. या प्रसंगी प्रा. स्वप्निल शहा, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. गणेश धुमाळ, डॉ. पायाल ओसवाल, प्रा. प्रा. एस. एस चौधरी आणि वाणिज्य शाखेतील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एस. एन. वाळके म्हणाले की, एम.बी.ए. चे महत्त्व समजावून सांगितले. प्रत्येक कंपनीमध्ये व्यवस्थापन व प्रशासन केल्याशिवाय कामकाज योग्य पद्धतीने होऊ शकत नाही.

Hello Pune Gramin
Page No. 8 Apr 06, 2022
Powered by: erelego.com

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**